# देवाच्या सांगण्याप्रमाणे मुलांना वागण्यास शिकवा


मुलांना शिकवणायांनी T1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, आमच्या मुलांनी तुझ्यावर प्रेम करुन तुझे आज्ञापालन करावे आणि आपल्या कुटुंबियांशी व मित्रांशी आदराने वागावे यासाठी त्यांचे साहाय्य कर''.


**1. देवाच्या वचनाच्या साहाय्याने मुलांच्या शिक्षकांची तयारी करा मुलांना कोणी शिकवावे.**

आपल्या मुलांना ख्रिस्ताचे आज्ञापालन करण्यास शिकवणे आणि प्रेमाने शिस्त लावणे हे प्रामुख्याने आईवडीलांचे काम आहे.

- ख्रिस्ती कुटुंबांनी प्रार्थना करणे आणि मुलांशी देवाच्या वचनातून बोलण्यासाठी दररोज कौटुंबिक भक्तीसाठी वेळ राखून ठेवला पाहिजे. ईयोबही असेच करीत असे.
- **इफिस 6:4** ह्या वचनात वडीलांना काय करण्यास सांगितले आहे?
- **नीती. 23:13** हे वचन आई-वडीलांना काय करण्यास सांगते?



- पुष्कळ वेळा मुले देखील इतर मुलांना प्रभावीपणे शिकवतात.



अलेक्स, तू तुझे काम चांगले केलेस. आता कृपा करुन, मोहन व शाजी ह्यांना त्यांचे काम पूर्ण करण्यास मदत कर.

तुम्ही मोठी मुले मला शिकवण्यात मदत करता तेव्हा तुम्हांला अधिक शिकायला मिळते आणि लहान मुलांना अधिक शिकायला मदत करता. तसेच पुढारी कसे व्हायचे हे हीं तुम्हांला शिकता येते.

- ख्रिस्ती मित्रांनी आणि नातेवाईकांनी आठवडयामध्ये मुलांना प्रशिक्षण देण्यास मदत करावी, त्यांना पवित्र शास्त्रातील गोष्टी सांगाव्यात, त्यांच्याबरोबर प्रार्थना करावी आणि तो काय करत आहेत हे सांगून त्यांचेऐकावे.

थॉमस, तू अतिशय कष्टाळू आहेस आणि तुझा सत्कार होणे योग्यच आहे. तू मला शिकवायला मदत केलेल्या गोष्टी तुला आठवडा भरात इतर मुलांनाही शिकवता येतील.



- पाळक पौल-तिमथी मुलांचा अभ्यास शिक्षकांना देतील आणि मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम मोठया माणसांसमोर सादर करण्यासाठी मुख्य उपासनेच्यापूर्वी तयारीसाठी वेळ देण्याची व्यवस्था करतील.

## मुलांना शिकवण्यासाठीची मार्गदर्शक तत्व :

- अगोदरच चांगली तयारी करा.
- गोष्टी सांगा, आणि मुलांना त्या साभिनय सादर करु द्या.




- प्रत्येक मुलासाठी प्रार्थना करा. देव मुलांची काळजी घेतो. शास्त्रलेख याविषयीचा उल्लेख वारंवार करतात.
- चांगले उपासना पुढारी आणि पाळक उपासकांच्या उपासनेत मुलांचाही **समावेश** करतात. मोशे, यहोशवा व एज्रा यांनीही तसेच केले होते. मुलांचा समावेश केवळ श्रोते म्हणून न करता त्यांना प्रौढांसमवेत काही करण्यासही सांगा. पौल-तिमथी मुलांच्या अभ्यासात त्यांच्यासाठी कार्यक्रम तयार करुन ते प्रौढांसमोर सादर करण्यासंबंधीचे मार्गदर्शन केलेले आहे.
- मुलांना सुट्ट्या खूप आवडतात. तसेच विश्वासणारे खेळाचे सामने, स्नेहसंमेलने, वाददिवसाचे समारंभ यासाठी एकत्र येतात ते प्रसंगही त्यांना आवडतात. आम्ही सुट्ट्या का घेतो ह्याविषयी शिकायला त्यांना आवडते. प्रभूच्या महान कृत्यांचा मुलांना विसर पडू नये यासाठी त्याने सुट्ट्या आणि आठवणी साजऱ्या करण्यास सांगितले (यहोशवा 4:1-7, निर्गम 12:24-27).




- मुलांना आवडणाऱ्या गोष्टी करण्यात त्यांना गुंतवून ठेवा. त्यांना काहीतरी तयार करण्यास आवडते.
- त्यांना गोष्टी तयार करायला आवडतात.
- मुलांना देवाचे भय बाळगण्यास आणि त्याच्यावर प्रीती करण्यास शिकवा (अनुवाद 4:10, 6:4-7, स्तोत्र 34:11; 111:10).
- पवित्र आत्मा मुलांची त्यांच्या पातका बद्दल खात्री पटवतो तेव्हा त्यांना विश्वासाने त्यांना ख्रिस्ताकडून मिळणारी पापक्षमा स्वीकारण्यास उत्तेजन द्या.
- मुलांना, विशेषत: लहान मुलांना, नक्कल, कृती आणि आवाज करणे आवडते. उदाहरणार्थ, तुम्ही यांना इसहाकाची पत्नी रिबका उंटावर बसून आली असे सांगता तेव्हा तुम्हांला असे सांगता येईल ''उंट चालताना त्याच्या टापांचा आवाज येतो. ऐका 'क्लौप!' 'क्लौप!' 'क्लौप!' 'क्लोप!' आता, तुमचे डोके वर-खाली असे लटलट हालवा, कारण उंटावर बसणारे सारखे वर-खाली, वर-खाली होत असतात!''
- शिक्षक आणि मुलांचे आई वडील यांच्या सलोख्याचे संबंध असावेत.

- मुलांना हळुवार पण ठामपणे शिस्त लावा.




- मुलांनी चांगले काम केले तर त्यांना शाबासकी द्या. यामुळे रागावण्यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे शिस्त लावता येईल.

**2. सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया आठवडयातील कार्यक्रम ठरवा.**

- विश्वासणारे आई-वडील आपल्या मुलांबरोबर अद्याप कौटुंबिक भक्तीकरीत नसतील तर त्यांची भेट घेऊन त्यांना एकत्रित भक्ती सुरू करण्यास मदत करा.
- शिक्षक म्हणून काम करता येईल अशा विश्वासणाूयांनी भेटून त्यांना ही मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करुन सांगा. नव्या शिक्षकांना, शक्य असल्यास, अधिक अनुभवी शिक्षकांबरोबर काम करण्याची संधी देऊन प्रशिक्षण द्या.

**3. सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया उपासनासभेसाठी योजना आखा.**

मार्क 4:1-20 मधून **येशूचा निरनिराळ्या जमिनींचा दाखला** सांगा. देवाच्या वचनातून देवाच्या मार्गाने शिकण्यासाठी आपण पुढील गोष्टी करणे अगत्याचे आहे हे सांगा...

1) आपल्या डोळयांनी किंवा कानांनी ते स्वीकारले पाहिजे,

2) त्याला आमच्या अंत:करणात मूळ धरू द्या.

3) त्यातून फळ मिळावे.

हे शिकताना अडथळा येईल असे येशूने सांगितले. ते अडथळे कोणते हे विश्वासणाूयांना आठवून सांगायला सांगा.

आई-वडीलांनी आपल्या मुलांना का शिक्षण द्यावे हे स्पष्ट करा. त्यासाठी वर दिलेली मार्गदर्शक तत्वे त्यांना समजून सांगा.

मुलांनी तयार केलेले कार्यक्रम त्यांना सादर करण्याची संधी द्या. **प्रौढांनी आणि मोठया मुलांनी,** विशेषत: त्यांनी ख्रिस्तावर आपला प्रभू म्हणून विश्वास ठेवला असेल तर, त्याने त्यांच्यासाठी काय केले याची साक्ष द्यावी.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी** अनुवाद 6:4-7 वाचा. आपण मुलांना येशूच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकवणे अगत्याचे आहे. यात एकत्र येऊन भाकरी मोडण्याचाही समावेश आहे.

दोन वा तीन जणांचे गट करुन काही वेळ एकत्र चर्चा करा. एकमेकांसाठी प्रार्थना करा. आणि मुलांसाठी शिकवण्याचे अधिक कार्यक्रम कसे घेता येतील याविषयी योजना आखा.

**पाठ करा अनुवाद 6:6-7**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net